RNI MAHMAR
36829-2010

ISSN - 2229-4929

Peer Reviewed

# Akshar Wangmay

International Research Journal

UGC-CARE LISTED

## Folk Literature & Folk Media

FEBRUARY 2020













**Executive Editor : Dr. Subash Nikam**

Principal,
Mahatma Gandhi Vidymandir's
Karmaveer Bhausaheb Hiray
Arts, Science and Commerce College,
Nimgaon, Tal. Malegaon Dist. Nasik (MS)

**Co- Editor : Prof. Arjun G. Nerkar**

**Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi**

Address : 'Pranav', Rukmenagar,
Thodga Road, Ahmadpur, Dist. Latur 413515

NI : MAHMAR - 36829-2010ISSN – 2229-4929

# AKSHAR WANGMAY

International Peer Reviewed Journal

UGC CARE LISTED JOURNAL

February - 2020

## Folk Literature & Folk Media

Executive Editor
Dr. Subhash Nikam
Principal
Mahatma Gandhi Vidyamandir's
Karmaveer Bhausaheb Hiray Arts, Science & Commerce College, Nimgaon,
Tal. Malegaon, Dist. Nashik [M.S.] INDIA

Co-Editors
Assisst Prof Arjun G. Nerkar
Dr. Kalyan S. Kokane
Dr. V. D. Suryawanshi

Chief Editor
Dr. Nanasaheb Suryawanshi

PRATIK PRAKASHAN, 'PRANAV, RUKMENAGAR, THODGA ROAD AHMEDPUR,

DIST. LATUR,-433515, MAHARASHTRA

Published by – Dr. Subhash Nikam, Principal, KBH College Nimgaon, Tal. Malegaon, Dist. Nahik, MS

The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The authosr shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.

© All rights reserved with the Editors

Price: Rs. 1000/-

**Mahatma Gandhi Vidyamandir's**

**Karmaveer Bhausaheb Hiray Arts, Science and Commerce College**
**Nimgaon, Tal. Malegaon, Dist.-Nasik [M.S.] India- 423212**

**National Conference on**
**Folk Literature & Folk Media**

**13th & 14th February 2020**

**Sponsored By**
**Savitribai Phule Pune University, Pune**

**Convener**
**Prin. Dr. Subhash Nikam**

**Co-ordinator**
**Prof. Arjun G. Nerkar**

**http://kbhnimgaoncollege.com**

| | | |
|---|---|---|
| 16 | लोकसाहित्यातील ' स्त्री लोकगीतांचे ' सौंदर्य<br>प्रा. एकनाथ पंडित आहेर, | 70-72 |
| 17 | ''लोकसाहित्याचा इतिहास व समाज प्रबोधन''<br>प्रा.जी.डी. रूपवते | 73-75 |
| 18 | लोकशाहीर वामनदादा गरुड आणि तमाशा<br>प्रा.डॉ.सुरेश.व्ही.जाधव | 76-81 |
| 19 | लोकगीते<br>स. प्रा. गावित केशव चिंतू | 82-85 |
| 20 | तमाशा एक लोककला<br>प्रा. डॉ. गायत्री सोनवणे | 86-87 |
| 21 | लोककला - गोंधळ<br>प्रा. नाना त्र्यंबक घुगे | 88-90 |
| 22 | भारतातील व्यावसायिक कलांचे अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून विश्लेषण<br>प्रा. डॉ. सुनिल बाळू घुगे | 91-94 |
| 23 | खानदेशातील आदिवासी जमातीतील लोकनृत्य<br>प्रा. डॉ. हिरालाल सोमा पाटील | 95-98 |
| 24 | मराठेशाहीच्या काळातील ऐतिहासिक पोवाडे एक आढावा<br>प्रा. योगेश किरण हिरे | 99-103 |
| 25 | देव–देवताविषयक ओवीगीते: एक आकलन<br>प्रा.डॉ.सुरेखा हरी जाधव | 104-107 |
| 26 | लोककला<br>सश्रीमती अहिरे कल्पना बाळासाहेब | 108-112 |
| 27 | लोकसाहित्यातील सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक या विशेष कला प्रकारातील प्रकट लोककलांचा अभ्यास<br>प्रा. कन्नोर संतोष गंगाधर | 113-115 |
| 28 | लोकवाद्य<br>प्रा. विनोद महादू केदारे | 116-119 |
| 29 | लोकसाहित्य : लोककथा प्रकार आणि स्वरूप<br>प्रा. डॉ. केशव पाटील | 120-123 |
| 30 | महाराष्ट्र लोकसंस्कृतीचे उपासक – गोंधळी<br>डॉ. किरण नामदेव पिंगळे | 124-127 |
| 31 | स्त्रीलोकगीते<br>प्रा. वर्षा योगेश आहिरे | 128-130 |
| 32 | लोकसंस्कृती, लोकजीवन, लोककला, लोकसाहित्य यांच्या परिप्रेक्ष्यातून मराठी जलसा : वैचारिक प्रबोधन आणि सांस्कृतिक अनुबंध<br>प्रा. कौतिक लोखंडे | 131-136 |

ISSN : 2229- 4929
February - 2020

# स्त्रीलोकगीते

प्रा. वर्षा योगेश आहिरे
सहा. प्राध्यापक (मराठी)

महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मालेगाव कॅम्प, मालेगाव.

पारंपरिक लोकजीवनाची अभिव्यक्ती लोकसाहित्यातून होत असते. समूहमनाचा अविष्कार लोकसाहित्यातून होतो.खेडयापाडयातील लोकांनी हजारो वर्षापासून मौखिक परंपरेने जोपासलेले साहित्य म्हणजे लोकसाहित्य. लोकसाहित्यात मानवी मनाचे, सामाजिक स्थितीगतीचे, मानवी जीवन व्यवहाराचे त्याचबरोबर सांस्कतिक परंपरेचेही चित्रण आलेले असते. लोकसाहित्यात लोककथा, लोकगीते, लोकनाटय, विधिनाटये, म्हणी, वाकप्रचार, उखाणे, कोडी अशा अनेक गोष्टींचा समावेश होतो. या सर्व साहित्याची निर्मिती एका व्यक्तीने केलेली नसते तर ती सामूहिक निर्मिती असते. लोकसाहित्याच्या जडणघडणीत लोकजीवनाचा महत्वाचा वाटा असतो. त्यामुळे लोकसाहित्य आणि समाजजीवन यांचा अतुट परस्परसंबंध असतो.

लोकगीते हे लोकसाहित्याचे महत्त्वाचे अंग मानले जाते.लोकसाहित्याचा बराचसा भाग लोकगीतांनी व्यापलेला आहे. यातील लोकगीतेही विविध प्रकारची आहेत.लोकगीते ही मौखिक परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत चालत आलेली आहेत. लोकगीतातून लोकमानसाचे, त्यांच्या विचार प्रणालीचे,कल्पनावैभवाचे, समाजजीवनाचे चित्रण आलेले दिसते. समाजातील रूढी, परंपरा, चालीरीती, माणसामाणसातील परस्पर संबंध यांचा अविष्कार लोकगीतांतून झालेला असतो. सण, उत्सव, श्रध्दा, समजुती, रूढी, परंपरा यातून चालत आलेल्या संस्कृतीचा परिचय लोकगीतातून होत असतो. कौटुंबिक आणि सामाजिक जीवनाचे चित्रणही लोकगीतातून येत असते. लोकगीतांची निर्मिती आणि स्वरूप समजावून घेतांना लोकसाहित्याच्या अभ्यासकांची मते लक्षात घ्यावी लागतात.

अलेक्झांडर क्रॉप यांच्यामते,'लोकगीत हे भावगीतासारखे असते, त्याला कर्ता नसतो. लोकगीतांची निर्मिती निरक्षरांकडून होत असते आणि त्या गीतांना प्राचीन परंपरा असते'.[१] सरोजिनी बाबर यांच्यामते,'विविध प्रकारच्या जातिवंत स्वरविलासोनी शिणगारलेले व अशिक्षितांनी कितीक वर्षांमागे रचले असतानाही केवळ पाठांतरांच्या बळावर पिढयानपिढया नवनवोन्मेषशालिनी तेजाने पुढच्या पिढीला उत्तेजित करणारे भावगीत ते लोकगीत.लोकगीत म्हणजे सामान्य माणसाच्या सामुदायिक जीवनाची अभिव्यक्ती होय.'वि.का. राजवाडे यांनी लोकगीतांची निर्मिती सामुहिक आणि उत्स्फुर्त असते, त्यांचा कर्ता अनामिक असतो, आणि लोकगीताची भाषाही लोकभाषा असते असे म्हटले आहे.[२]

यावरून लोकगीते म्हणजे जिवंत काव्य, लोकगीतातून लोकजीवन, लोकसंस्कृती आणि रितिरिवाज आदींचे दर्शन आपणास होते. लोकगीते नत्य, नाटय, संगीत, विधी आणि खेळ यांच्यशी जोडलेली असतात आणि मुख्य म्हणजे लोकगीते मौखिक स्वरूपात परंपरेने चालत आलेली असतात.

लोकसाहित्याची परंपरा ही मौखिक स्वरूपाची असल्यामुळे मौखिक परंपरेने स्त्रीगीते, ओव्या, स्त्रियांच्या कथा, विधीगीते, म्हणी, वाकप्रचार, उखाणे यांचा समावेश होतो. लोकगीतांचे स्वरूप, लोकगीते म्हणणाऱ्या व्यक्ती, लोकगीते ज्या प्रसंगाशी आणि विधि उत्सवाशी संबंधित असतात ते विधिउत्सव, लोकगीतांचा आशय यांचा विचार करून लोकगीतांचे बालकांची लोकगीते, स्त्रीगीते आणि पुरूषांची गीते असे वर्गीकरण केले जाते. स्त्रीगीतांमध्ये श्रमगीते, विधिगीते, नत्यखेळगीते, सणउत्सवाची गाणी, उपासनागीते यांचा समावेश होतो. 'स्त्रियांमध्ये लोकगीते वर्षानुवर्ष मौखिक स्वरूपात आली आहेत. रूढी, रीतिरिवाज, विधी, सण, उत्सव, यांमध्ये गीतांना विशेष स्थान आहे. ही गीते युगानुयुगे स्त्रियांनी जतन केली आहेत. परंपरा जतन करण्याचे कार्य प्रामुख्याने स्त्रियांकडून घडते, बहुतेक सर्व जण, उत्सव, विधी इत्यादीमध्ये स्त्रियांचा सहभाग असतो आणि स्त्रिया गीते गातात. स्त्रियांच्या धार्मिक स्वरूपाच्या सर्व विधीमध्ये लोकगीतांना महत्व आहे. कुटुंबातील नातेसंबंध, समाजीतील स्त्री–पुरूषसंबंध इत्यादी संबंधीच्या गीतातून स्त्रियांचे मन प्रकट होते. स्त्रियांच्या भावजीवनाची अभिव्यक्ती स्त्रियांच्या लोकगीतांत असते.[३]

ग्रामीण भागात अनेक स्त्रिया आपले श्रम हलके व्हावेत, मन हलके व्हावे, मनोरंजनासाठी लोकगीते म्हणतांना दिसतात. अनेक प्रतिमा प्रतिकांचा वापर स्त्रीगीतात केलेला असल्यामुळे संस्कृतीचे जतन करण्याचे काम स्त्रीगीतांनी केले आहे. कौटुंबिक जीवनाचे प्रत्यकारी जीवनचित्रण स्त्रीगीतांतून होत असते. या गीतांतून दैनंदिन जीवनातील घटनाप्रसंग, भावभावना, अपेक्षा, रूढी–परंपरा या सर्व गोष्टींचा सहज अविष्कार झालेला असतो. स्त्रियांच्या श्रमगीतात ज्यात्यावरील ओव्यांचा मोठया प्रमाणात समावेश होतो. जात्यावरील ओव्या म्हणजे स्त्रियांच्या भावनांचा सहजरम्य असा अविष्कार असतो. जीवनातील विविध प्रसंग त्यात मनापासून गायिलेले असतात. या ओव्यामध्ये नातेसंबंध, देवदेवतासंबंधीच्या, वारकरी संप्रदायाच्या प्रभावाच्या ओव्या, पौराणिक कथांवर आधारित ओव्या असे विविध आशय आलेले दिसून येतात. पुर्वीच्या काळी पहाटेच्या वेळी जात्यावर धान्य दळावेलागायचे. पहाटेच्या एकांतात जात्यावर दळताना आपल्या मनातील साऱ्या वेदना,

दुःख, आनंद ओवीतून व्यक्त होत असते. आईवडिलांबद्दलचा आदर, भावाबहिणीबद्दलचे प्रेम, मूलांविषयीच्या वात्सल्याच्या भावना, मामा, मावशी, दीर, नणंद, सासू, सासरा, नवरा अशा साऱ्या नात्यातील परस्परसंबंधाचे चित्रण ओवीगीतातून व्यक्त झाले आहे.

आधी ववी गाते, बाप्पाजी रायाला
मागून हळदीच्या येलाला, मायबाईला
बाप्पाजी माझा वड, बया मालन पिंपरण
दोगाच्या सावलीत, झोप घेते मी संपूरण

स्त्री आई–बापाच्या विश्वासावर जगते. लहानपणापासून दोघांनी तिला लाडाने वाढविलेले असते. आईवडिलांच्या शाश्वत प्रेमाचा अनुभव तिला आलेला असतो. लग्न झाल्यावर सासरी गेल्यानंतर आपल्या मनाचे हितगुज करण्यासाठी तिला आईचा आधार हवा असतो. तिचे प्रेम, तिला आयुष्यभर आठवत असते. आपल्या भावाबहिणीचे नातेसंबंधही ओवीगीतातून प्रकट झालेले असते.

आम्ही दोघी बहिणी, दोन बाजूच्या बारवा
मध्ये जोंधळा हिरवा, भाऊराया

घरात भावाला मोठेपणा देण्यातही तिला अभिमान वाटतो. परंपरेने तिच्या मनाची घडणच तशी केलेली होती. समाजव्यवस्थेचे चित्रण स्त्रीगीतातून प्रत्येक ठिकाणी प्रत्ययाला येते. लग्न होऊन मुलीला सासरी जावेच लागते. मुलगी म्हणून आपल्या भावनांचा विचार न करता एखादी वस्तू विकावी त्याप्रमाणे आपल्याला विकले जाते याचे दुःख तिला वाटते. ती म्हणते,

'लेकीचा जल्म। जशी तांदुळाची गोणी
बाप विकून झाला वाणी'

महेरप्रमाणे सासरचे चित्रण स्त्रीगीतातून आले आहे. यात स्त्रीच्या मनातील सासरविषयी भावभावना, पती–पत्नी मधील परस्परसंबंध यांचे चित्रण येते. पूर्वी लहान वयात लग्ने होत असल्यामुळे मूलीच्या मनावर सासर विषयी अनेक संस्कार असायचे.

या संस्काराची शिदोरी सोबत ठेवून सासरी जीवन जगत असे. जीवनात कितीही त्रास झाला तरी सासरविषयी आपले कर्तव्य ती निमूटपणे पार पाडत असे. सासू–सूनेविषयी नात्याचे वर्णन अनेक स्त्रीगीतातून येते. आपल्या अनुभवविश्वाची अभिव्यक्ती अगदी सहजपणे स्त्रीगीतातून व्यक्त झालेली दिसून येते. पती–पत्नीमधील प्रेमही तिच्या ओवीतून प्रकट झालेले दिसते.

"भरताराचं सुख सांगते मी गोतामंदी।
अष्टीच्या धोतराची केली सावली शेतामंदी।"

स्त्रीलोकगीतांमध्ये सण–उत्सवाची गाणीही मोठया प्रमाणात येतात. भारतीय परंपरंतेत सण–उत्सवांना खुप महत्व आहे. आणि या सण उत्सवात स्त्रियांचा सहभाग असतोच. मंगळागौर, हादगा, भोंडला, नागपंचमी इत्यादी सणसमारंभाच्या निमित्ताने सादर होणारी फेराची गाणी, स्त्रीमनाचे दर्शन घडवितात. सासुरवास, माहेरची ओढ, वात्सल्य, प्रेम, शृंगार, दुःख, अगतिकता अशा अनेक भावनांचे प्रभावी चित्रण लोकगीतातून आलेले दिसते. नागपंचमी, संक्रांत आणि दिवाळीत येणारी भाऊबीज या सणांना स्त्रीजीवनात खूप महत्व आहे. या सणांच्या निमित्ताने माहेरी जाण्याची अनिवार ओढ स्त्रीमनाला असते. स्त्रियांच्या या ओढीचे चित्रण गीतांतून येते.

नागपंचमीच्या सणासाठी मुली माहेरी आलेल्या असतात. सासरी दबून राहिलेल्या भावना मूक्तपणे गीतातून प्रकट होतात. माहेरी आल्यावर मोकळया मनाने आपल्या भावना व्यक्त करतात. त्यात सासर विषयीचे चांगले–वाईट अनुभव आपल्या गीतातून व्यक्त करतात. नागपंचमीच्या सणाला नागाची पूजा करण्यासाठी स्त्रिया वारूळाला जातात. नागाला भाऊ मानून पती मानून त्याची पूजा केली जाते. दुध–लाहया यांचा नैवद्य दाखवतात. त्यावेळी फेराची गाणी म्हणतात.

चल ग सये वारूळाला, नागोबाला पुजायला
हळद कुंकू वहायला, ताज्या लाया वेचायला
या ग या मैतरणी, या ग या गडयिनी

नागपंचमी सणाच्या वेळी फेराची गाणी म्हटली जातात. या गाण्यांमध्ये प्रतिमांचा वापर करून गाणी म्हटली जातात. फेराच्या गाण्यांमध्ये प्रसंग निर्माण करून गाण्याला गती प्राप्त होते. ही गीते गदयात्मक असली तरी त्यात तालतत्व व लयात्मक रचना असते. स्त्रियांच्या आवडी–निवडी सासर माहेरची माणसं, माहेरची ओढ याचे चित्रण या गाण्यांतून होते.

अश्विन महिन्यात हादगा हा खेळ महाराष्ट्रात सर्वत्र खेळला जातो. परंपरेने आलेली गाणी या खेळात मुली म्हणतात. काही ठिकाणी हत्तीचे चित्र काढून त्याची पूजा केली जाते तर काही ठिकाणी हादग्याची फांदी ठेवून पूजा केली जाते. निसर्गशक्तीची पूजा करणे ही भावना त्यामागे आहे. हादगा हा उत्सव लहान लहान मुली एकत्र येऊन फेर धरून गाणी म्हणून साजरा करतात.

'वाजे चौघडा रूणझुणा

ISSN : 2229- 4929
February - 2020

आला ग हादगा पावणा
दारी तुळस दवणा'

हादगा –भोंडल्याची गाणी मौखिक परंपरेने पिढयानपिढया रूढ आहेत ही गाणी नवतारूण्याची स्त्रीच्या सर्जन शक्तीचे महत्व विशद करणारी आहेत. म्हणजेच स्त्रियांच्या उत्सवाची गाणी आहेत. समाज आणि कुटुंब यातील नातेसंबंधांच्या अतिशय तरल भावछटा या गाण्यांतून व्यक्त झालेल्या दिसतात. समाज व्यवस्थेत स्त्रियांच्या मनाची झालेली कुचंबणा, तिने रंगविलेली स्वप्ने याचे प्रत्ययकारी चित्रण या गीतांतून आलेले असते.

'दिवाळी' हा मुल, तरूण, वयस्क आणि वृध्द तसेच सासरवाशिणी आणि माहेरवाशिणी मुलींसाठी महत्वाचा सण–त्यातही भावाबहीणीच्या नात्याला या सणात महत्वाचे स्थान आहे.

'सणामंधी सण, सण दिवाळीचा मोठा
चलत्यात चारी वाटा, बहीण भावंडाच्या'

प्रत्येक बहिणीला आपल्या भावाविषयी अपार प्रेम असते. भाऊबीजेच्या दिवशी आपला भाऊ म्हणजे सावकार अशी भावना ओवीतून साकार होते.

'दिवाळीच्या दिवशी, ताटात मोतीहार
ओवाळीन मी, माझा बंधुजी सावकार'

भारतीय कुटुंबव्यवस्थेत विवाह संस्थेला अतिशय महत्व आहे. विवाहानंतर स्त्रीला नवे नातेसंबंध जोडावे लागतात. मुलीचे वयात येणे, तिचे लग्न होणे, पुत्रप्राप्ती होणे या गोष्टीलाही कुटुंबव्यवस्थेत महत्त्व आहे. मातृत्व या गोष्टीला भारतीय संस्कृतीत अनन्यसाधारण महत्व असल्याने तिच्या मातृत्वाची पूजा विधिवत स्वरूपात केली जाते. रजस्वला अवस्थेपासून मातृत्वावस्थेपर्यंतच्या काळात अनेक विधी केले जातात आणि त्या विधीच्या निमित्ताने गीते म्हटली जातात.

विवाह हा मानवी जीवनातील महत्वपुर्ण प्रसंग आहे विवाहाच्या वेळी अनेक उपविधी केल्या जातात. लग्न ठरल्यापासून ते मुलीची पाठवणी करेपर्यंत जे जे विधी संपन्न होतात त्या विधींना ओवी आणि गीतांची साथ लाभलेली दिसून येते. प्रत्येक विधीच्या जोडीला गीते म्हटली जातात. जसे मांडव, हळद, आंघोळ, मुहूर्तमेढ रोवणे यावेळी म्हटली जाणारी गाणी वैशिष्टयपुर्ण आहेत. संस्कारांचा, रूढी–परंपरांचा भाग म्हणून हे विधी पार पाडले जातात. पण त्यातून मनोरंजनही होत असते.

सारांश:–

स्त्रीलोकगीते महाराष्ट्रीय संस्कृतीतील महत्वपुर्ण ठेवा आहे. विविध रूढी–परंपराची जोपासना स्त्रीगीतातून झालेली दिसते. या स्त्रीगीतातून समाज जीवनाचे समाज आणि कुटुंब यातील नातेसंबंधाच्या तरल भावछटा स्त्रीगीतातून व्यक्त झालेल्या आहेत. सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचे प्रतिबिंब स्त्री लोकगीतात पडलेले दिसते. म्हणून लोकगीते ही समूहजीवनाचा आणि समूहमनाचा अविष्कार आहे असे म्हटले जाते.

संदर्भ साहित्य

१) शिंदे डॉ. विश्वनाथ, लोकसाहित्यमीमांसा (भाग पहिला) स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९८, पृ. क्र. ६०
२) शिंदे डॉ. विश्वनाथ, लोकसाहित्यमीमांसा (भाग पहिला) स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९८ पृ. क्र. ६२
३) मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे स्वरूप, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद २००९, पृ.क. २४६
४) शिंदे डॉ.विश्वनाथ, लोकसाहित्यमीमांसा (भाग दुसरा), स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, २००६, पृ.क्र. १८५
५) शिंदे डॉ. विश्वनाथ, लोकसाहित्यमीमांसा (भाग पहिला) स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९८, पृ. क्र. १८५
६) खंदारे डॉ. साहेब, लोकसाहित्य: शब्द आणि प्रयोग, प्रतिमा प्रकाशन, पुण? २००४ पृ.क्र. २०१